# योजनेचे नावः- इंदिरा आवास योजना

१) **योजनेचे उद्दिष्टः-** ग्रामीण भागातील अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती, मुक्त वेठबिगार व दारिद्रय रेषेखालील इतर प्रवर्गातील बेघर लोकांना नविन घरकुल बांधकामासाठी आर्थीक सहाय्यता देणे.

२) **योजनेचे स्वयरूपः-** हि केंद्र पुरस्कृत योजना असून केंद्र व राज्य शासनाचा हिस्सा खालील प्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| केंद्र शासन ७५ टक्के | रू २६,२५०/- |
| राज्य शासन २५ टक्के | रू ८,७५०/- |
| राज्य शासन अतिरिक्त अणुदान प्रति घरकुल | रू ८,५००/- |
| लाभार्थी हिस्सा | रू १५००/- |
| **एकूण** | **रू. ४५,०००/-** |

अशा प्रकारे प्रति घरकुल रू. ४५,०००/- अशी किंमती निश्चित करण्यात आलेली आहे.

३) **अटी व शर्ती :-** १) ग्रामीण भागात दारिद्रय रेषेखाली राहऱ्या बेघर व्यक्तीसाठी ही योजना राबविली जाते. लाभार्थीचे नाव ग्राम पंचायतीच्या बेघरांच्या प्रतिक्षा यादीत असणे आवश्यक आहे. या योजनेतील लाभार्थीची निवड पुढील प्राथम्य क्रमाने केली जाते.

अ) मुक्त वेठबिगार

ब) अनुसुचित जाती/अनुसुचित जमातीचे कुटुंबे, अत्याचारास बळी पडलेली अनुसुचित जाती/अनुसुचित जमातीची कुटुंबे, विधवा व अविवाहीत

स्त्रिया प्रमुख असलेली अनुसुचित जाती/अनुसुचित जमातीची कुटुंबे पुर, आग, भुकंप, चक्रीवादळ आणि अशाच प्रकारच्या नैसर्गिक

आपत्तीची बाधा झालेली अनुसुचित जाती/अनुसुचित जमातीची कुटुंबे.

क) बिगर अनुसुचित जाती/अनुसुचित जमातीची कुटुंबे.

ड) अपंग शारिरीकदृष्टया अपंग

इ) सैनिक कारवाईत मारल्या गेलेल्या सरक्षण सेवा/निमलष्करी दलाच्या कर्मचारीवर्गाची कुटुंबे/विधवा माजी सैनिक व निमलष्करी दलाचे

विकृत सदस्य.

ई) दारिद्रय रेषेखालील प्रवर्गातील विस्थापित झालेली व्यक्ती भटक्या निमभटक्या व विमुक्त जमाती आणि विकलांग सदस्य असलेले कुटुंबे.

२) इंदिरा आवास योजनेच्या मार्गदर्शक तत्वाप्रमाणे एकूण वाटपाच्या ६० टक्के निधी अनुसुचित जाती/अनुसुचित जमातीच्या प्रवर्गाच्या

लोकांसाठी राखीव ठेवला जातो.

३) योजनेअंतर्गत ३ टक्के आरक्षण हे समस्तर म्हणजे अ.जा., अ.ज. व इतर या सारख्या घटकातील विकलांग व्यक्ती त्यांच्या संबंधित प्रवर्गात

मोडतील असे असते.

४) लाभार्थीकडे स्वतःचा भूखंड असावा.

५) लाभार्थीने स्वतः घराचे बांधकाम करणे आवश्यक आहे.

६) सदर बांधकाम १ वर्षाच्या कालावधीत पूर्ण होणे आवश्यक आहे.

७) घरकुलांसोबत निर्धुर चुल व शौचालय बांधकाम आवश्यक आहे.

**<u>५) आवश्यक कागदपत्रे :-</u>**

१) लाभार्थी दारिद्रय रेषेखालील असल्याचे प्रमाणपत्र.

२) अनु.जाती, अनु. जमातीचे असल्याचे प्रमाणपत्र.

३) कायम प्रतिक्षा यादीनुसार, ग्राम सभेचा ठराव.

**<u>६) संपर्क पत्ता :-</u>**

१) खंडविकास अधिकारी, पंचायत समिती सर्व.